## रे. दि. मु. नं. ९४/२०२४
## निशाणी ४६ वर आदेश

प्रस्तुतचेकामी वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्याविरूध्द नि. क्र. ५ व ३४ वर पारीत केलेला दरम्यानचा मनाई आदेश आजअखेर कायम आहे तो पुढे कायम करावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या विधीज्ञांनी सदरचा मनाई आदेश पुढील तारखेपर्यंत वाढवणेसाठी हरकत घेतली.

३. वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दरम्यानचा मनाई आदेश आजअखेर कायम आहे. तो पुढील तारखेपर्यंत कायम करण्यात यावा.

४. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, जप्ती किंवा त्याबाबतची कोणतीही कार्यवाही चालू नाही त्यामुळे पारीत केलेला दरम्यानचा मनाई आदेश रद्द करावा अशी त्यांनी विनंती केली.

५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, दि. ०२.०८.२०२४ रोजी नि. क्र. ५ व ३४ वर प्रतिवादी क्र. ४ यांचेविरूध्द एकतर्फा दरम्यानचा मनाई आदेश व प्रतिवादी क्र. ५ विरूध्द दरम्यानचा मनाई आदेश पुढील तारखेपर्यंत पारीत केलेला होता. प्रस्तुतचे कामी प्रतिवादी क्र. ४ आजरोजी हजर झाले असून त्यांनी तुर्तातुर्त मनाई अर्जाला म्हणणे देण्याकरीता मुदत मागितली आहे. अभिलेखावरील नि. क्र. ३९/१३ वरील नोटीसीचे अवलोकन केले असता मंडलअधिकारी नेवरी यांनी दि. ०५.०८.२०२४ रोजी मिळकतीचा कब्जा मा. तहसिलदारसो कडेगाव यांच्या आदेशाप्रमाणे घेण्यासाठी नेमलेली होती. प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी वादी यांच्याविरूध्द जप्ती किंवा त्याबाबतची कोणतीही कारवाई चालू नाही असा युक्तीवाद केला. परंतू त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून त्यांनी दि. ०८.०८.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. ४ यांचेकडे र. रू. ७,००,०००/– भरल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशा परिस्थितीत आजअखेर दिलेला दरम्यानचा मनाई आदेश पुढील तारखेपर्यंत वाढवणे योग्य व उचित वाटते.

### आदेश

दि. ०२.०८.२०२४ रोजी पारीत केलेला प्रतिवादी क्र. ४ यांचेविरूध्द एकतर्फा दरम्यानचा मनाई आदेश व प्रतिवादी क्र. ५ विरूध्द दरम्यानचा मनाई आदेश पुढील तारखेपर्यंत कायम करण्यात येतो.

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2024.08.14 17:47:13 +05'30'

(**सी. आर. पाटील**)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर, कडेगांव

दि. १४.०८.२०२४